Lalita Gandbhir
4200 North Ocean Dr.
#1501 - 2
Riviera Beach FL 33404

lalitagandbhir@hotmail.com

# आमचा ड्रायव्हर आणि माझी आई

आमची मुलं सुभाष, रोहन आणि मंजू शाळेत जायला लागल्यापासून त्यांच्या एक्स्ट्रा करिक्युलर ॲक्टिव्हिटीजना त्यांना नेण्यापोचवण्याचं काम मीच करत होते. सुमेशला वेळच नव्हता. तो पुष्कळदा परगावीच असायचा आणि गावात असला तरी त्याला ऑफिसात काम असायचं.

सर्वात धाकटी मंजू शाळेत जायला लागल्यावर घरी माझा वेळ जाईनासा झाला. म्हणून गाजराची पुंगी, वाजली तर वाजली असा विचार करून मी एक छोटंसं भारतीय व आशिया खंडातील स्त्रियांच्या कपड्यांचं दुकान काढलं. सुरवातीला रडतखडत चालणारं ते दुकान गेल्या दोन वर्षांत उत्तम चालू लागलं. म्हणून मी दुसरं, मग तिसरं दुकान उघडलं. खरेदीविक्रीच्या कामाला सहा बायका व मुली नेमल्या. तरी बरंच, विशेषतः खरेदीची कामं, मलाच करावं लागत असे. परिणामी मला वेळ मिळेनासा झाला.

शिवाय मुलांच्या शाळेव्यतिरिक्त ॲक्टिव्हिटीज वयानुसार वाढतच गेल्या. सॉकर, बेसबॉल, स्विमिंग, पियानो लेसनस्, ड्रामा प्रॅक्टिस, डिबेटिंग इत्यादी इत्यादी, तीन दुकानं चालवणं, घरकाम आणि मुलांना नेण्याआणण्याचा उद्योग संभाळणं मला कठीण होत चाललं होतं.

सुमेशला माझ्यावर पडणाऱ्या ताणाची जाणीव होती. एक दिवस तो मला म्हणाला, "तुला माझ्याबरोबर काम करणारा पॉल आठवतो का? तो मला सिनियर होता."

"आठवतो. तो आणि त्याची बायको आपल्याला एका पार्टीत भेटले होते." मी म्हटलं.

"त्या पॉलला आणि त्याच्या बायकोला, मुलांना इकडेतिकडे आणण्यापोचवण्याच्या कामाला एक टोनी नावाचा इटॅलियन माणूस मदत करायचा. या वर्षी पॉलचा धाकटा कॉलेजात गेला. म्हणून टोनी मोकळा आहे. खरे तर टोनी घरं बांधणाऱ्या डेव्हलपरकडे नोकरी करायचा. पण त्याची पाठ दुखावली. तसली कामं त्याला करता येत नाहीत म्हणून तो असे सटरफटर

उद्योग करतो. तो अगदी वेळेवर येतो. मुलांना व्यवस्थित नेतो आणतो अशी त्याची शिफारस पॉलने केली. त्याचा इंटरव्ह्यू घेण्याची जरूरी नाही."

मी खूष झाले. "अगदी देवानेच त्याला पाठवलं." मी म्हटलं.

"देवाने नाही, पॉलने." सुमेश म्हणाला, "पॉलच्या रुपाने तुझा देव आला असेल कदाचित."

मी म्हटलं,"थट्टा नको. तो किती पैसे घेतो?"

"हे बघ, त्याला अर्ध्या दिवसाचा पगार द्यावा लागेल. शिवाय गॅसचे पैसे. तू पुणेरीपणा करून त्याच्याशी घासाघीस करू नकोस. मी पॉलला विचारून त्याचा पगार ठरवतो." सुमेशने सांगितलं.

मी विचारलं, "तो केव्हापासून येईल?"

"तू बोलावशील तेव्हापासून. हा घे त्याचा नंबर." सुमेशने त्याचा नंबर लिहिलेला कागद माझ्या हातात दिला. "पॉल म्हणाला की त्याला आपल्या गावाची चांगली माहिती आहे."

त्या रात्री मी टोनीला फोन केला आणि दुसऱ्या दिवशी दुपारी एक वाजता यायला सांगितलं.

माझी आई दर उन्हाळ्यात भारताहून माझ्या घरी न्यू जर्सीला चार महिन्यांसाठी येत असे. ही परंपरा सुभाषचा जन्म झाला तेव्हा सुरू झाली. तेव्हापासून आई येतच राहिली. तिला माझ्या मुलांचा व माझा सहवास लाभत असे. ती आमच्यासाठी उत्साहाने स्वैपाक करत असे. तिने केलेलं जेवण सुमेश व मुलांना आवडत असे. शिवाय ती बागेत काम करत असे. तिने सुंदर बाग केली होती.

तिला मी ड्रायव्हर सापडल्याची बातमी सांगितली. ती म्हणाली, "उत्तम झालं. पूर्वी तुझ्यावर फक्त घराची आणि मुलांची जबाबदारी होती. मग तू दुकान काढलंस. दुकान, मुलांना नेणंआणणं, घरकाम सगळं तुला एकटीला कसं जमणार न् तू कायम दमलेली दिसतेस. ड्रायव्हरमुळे तुझं काम थोडंतरी कमी होईल."

"तो उद्या दुपारी येईल. त्याला मी मुलांच्या शाळा, पटांगण, पूल हे सगळं दाखवणार आहे. तूपण माझ्याबरोबर चल. एक वाजता तयार रहा."

"थंडी नसली तर येईन." ती म्हणाली.

"अग, नुकता ऑगस्ट संपलाय. एव्हढ्यात थंडी पडणार नाही."

"तुला नसेल थंडी वाजत. पण मला वाजते."

ते खरं होतं. तिची आणि माझी थंडीची व्याख्या वेगळी होती.

माझी आई आमच्या घरी असली तर सकाळी उठून चहा घ्यायची. मग आमच्या बागेत जाऊन फुलं तोडायची आणि आंघोळ करून देवपूजा करायची. तिची स्तोत्रं म्हणायची. मग स्वैपाक करायची. मुलं लहान असताना ती त्यांना सांभाळायची. त्यांच्याबरोबर टीव्ही बघायची. 'सेसमी स्ट्रीट' बघून ती मोडकंतोडकं इंग्लिश बोलू लागली. समर संपला की तिला परत पुण्याला जाण्याचे वेध लागायचे.

माझे आईवडील व आम्ही दोघं मुलं एका वाड्यात एका तीन खणी जागेत रहात होतो. माझ्या वडिलांना पोस्टात नोकरी होती. आम्ही खाऊनपिऊन सुखी होतो. माझा मोठा भाऊ जयंता चौदा व मी बारा वर्षांची असताना माझ्या वडिलांना पोटदुखीचा विकार झाला. त्यांचे ऑपरेशन करावे लागले. त्यात ते गेले.

माझी आई दुःखात बुडली. पण दोन मुलांकडे बघून तिने स्वतःला सावरलं.

माझे आजोबा, आईचे वडील, जवळच रहायचे. त्यांचं पुस्तकांचं दुकान होतं. त्यात त्यांनी तिला नोकरी दिली. आईचे बचतीचे पैसे होते. ते पैसे व तिचा पगार ह्या तुटपुंज्या पैशावर तिने काटकसरीने घर चालविलं. मधूनमधून ती आपले दागिनेही विकत असे.

मी चौदापंधरा वर्षांची असताना माझ्या मोठ्या मामेबहिणीने मला एक सनसनाटी बातमी सांगितली. ती म्हणाली, "एका विधुर बंगलेवाल्याने आजोबांकडे तुझ्या आईसाठी मागणी घातली होती. तो म्हणाला होता, "माझी पत्नी बाळंतपणात गेली. मला दोन लहान मुलं आहेत. मी छत्तीस वर्षांचा आहे. वीसबावीस वर्षांच्या तरुणीशी विवाह करण्याची माझी इच्छा नाही. तुमच्या मुलीचं आणि माझं वय एकमेकांना साजेसं आहे. आम्हा दोघांनाही मुलं आहेत. मला आणखी मुलं नकोत. सहधर्मचारिणी हवी आहे. आमचं लग्न झालं तर माझ्या मुलांना आई मिळेल. तिच्या मुलांना वडील मिळतील. सुदैवाने मला पैशाची कमी नाही. मी तिच्या मुलांना शिकवीन. त्यांची लग्नं करून देईन." आपल्या आजीआजोबांची, तुझ्या वडिलांच्या नातेवाईकांचीपण ह्या पुनर्विवाहाला संमती होती. पण तुझी आईच नाही म्हणाली."

ही बातमी ऐकून मला धक्का बसला. मी काही बोलत नाही हे पाहून ती म्हणाली, "तुझी आई खूप सुंदर आहे. लाखात एक आहे असं म्हणतात. तिला मागणी आली त्यात काय आश्चर्य ? पण तिने या मागणीला का नकार दिला हे मला समजत

नाही. कधीतरी तू तिला तिने ही ऐश्वर्यात राहण्याची संधी का दवडली हे विचारशील का? आणि मला सांगशील का? मला तो प्रश्न विचारण्याची हिंमत नाही."

मी होकारार्थी मान डोलावली. थोडा विचार केल्यावर आईने 'नाही म्हटलं' याचा मला स्वार्थी आनंदच झाला. मला सावत्र वडील नको होते. ती बातमी मी मनाच्या एका कोपऱ्यात ठेवून दिली. दादालाही सांगितली नाही.

त्या वयात आईवडिलांच्या लैंगिकतेबद्दल मी कधी विचारही केला नव्हता. माझ्या आजीच्या कर्मठ छायेत स्त्रीपुरुषसंबंध याचा विचारही मनात आणणं मला लज्जास्पद वाटायचं. कथाकादंबऱ्यांतून आणि सिनेमांतून काही वाचलं जायचं, कानावर पडायचं आणि दिसायचं तेव्हढंच.

शिवाय माझ्या दृष्टीने तेव्हा तिशीपलीकडची माणसं म्हातारपणाकडे पावलं उचलत होती. ह्या विचाराला थोड्याफार प्रमाणात आईच जबाबदार होती. ती मधूनमधून दादाला आणि मला सिनेमा बघायला तिकिटाचे पैसे द्यायची. मी किंवा दादाने "तूपण ये ना आई"असं म्हटलं तर "मला म्हातारीला कशाला सिनेमा?" असं काहीतरी बोलायची.

माझं लग्न झालं. मी तिशीकडे झुकू लागले आणि प्रथम आईच्या एकाकी आयुष्याबद्दल माझ्या मनात विचार आले. वडील गेल्यापासून तिला पुरुषाचा सहवास नव्हता. ती काटकसरीने राहत होती. साध्या सुती साड्या नेसायची. लग्नामुंजीला जाणं टाळायची. सिनेमानाटकाला क्वचितच जायची. जयंता लग्न होऊन मुंबईला स्थायिक झाला. माझं लग्न होऊन मी अमेरिकेला पोचले. त्यानंतर ती पूर्ण एकटी होती. मामा, मामी, जयंता, वहिनी तिला 'रहायला ये' म्हणून बोलवायचे. पण ती 'मी माझ्या घरीच बरी' असं म्हणून एकटीच राहिली. दुकानात मात्र ती नेमाने जात असे. विक्रीचं काम करत असे.

तिशीपलीकडची आई म्हातारी नव्हती हे समजायला मला तिशी गाठावी लागली होती.

सुमेशशिवाय माझं जीवन उजाड झालं असतं ह्याची मला जाणीव झाली होती. सुमेशला काही झालं तर उर्वरित आयुष्य मी एकटी काढीन का? हा डोक्यात आलेला विचार मी झटकून टाकला. पण आईने एकाकी आयुष्य काढलं होतं हे मला जाणवलं. तिने पुनर्विवाहाची चालून आलेली संधी का दवडली होती हा प्रश्न अजून अनुत्तरित होता. आम्ही दोघं मुलं? मागासलेली मनोवृत्ती? लोक काय म्हणतील ही भीती? का बाबांवरचं प्रेम?

माझ्या आईबाबांचा प्रेमविवाह झाला होता का? हे एक गूढ होतं. बाबांनी आईला तिच्या वडिलांच्या दुकानात पुस्तकं विकताना पाहिलं होतं. मग त्यांची आई माझ्या आईला भेटायला आली होती. "तुमच्या मुलीला माझ्या मुलासाठी मागणी घालायला

आले आहे बरं का" अशी पुणेरी स्पष्टवक्ती सुरवात केली होती. आजोबांना हे स्थळ पसंत नव्हतं. मुख्य कारण बाबांची कमी पगाराची नोकरी. पण आईने सांगितलं, "मला ह्याच मुलाशी लग्न करायचं आहे." म्हणून आजोबांनी संमती दिली.

आईचं लग्न ठरल्यावर मामा तिला चिडवायचा. तो म्हणायचा, "ताईने आणि भावजींनी दुकानात न बोलता डोळ्यांनी खाणाखुणा करून प्रेम जमवलं."

त्यात तथ्य होतं का?

बाबांवरच्या प्रेमामुळे आईने पुनर्विवाह केला नव्हता का?

कितीही कुतूहल असलं तरी तिच्या आयुष्यातल्या या नाजूक धाग्याबद्दल तिला प्रश्न विचारून तिच्या भावनिक जगात ढवळाढवळ करण्याचा मला काय अधिकार? असे विचार मला सतावत. म्हणून अजून तरी "तू पुनर्विवाह का केला नाहीस?" असं तिला विचारण्याची हिंमत मला होत नव्हती. एखादी मैत्रीणच असा प्रश्न विचारू शकते असं मला वाटून गेलं.

हल्ली "मुलं शाळेत गेली की मला कंटाळा येतो" असं ती म्हणू लागली होती. दुपारी मला वेळ असला तर तिला घेऊनच मी मुलांना आणायला त्यांच्या शाळेत जायची. तिथून ती गेम्सना यायची. तिचा वेळ बरा जायचा. तिला मुलांच्या शाळा, पटांगण, पूल यांची माहिती झाली होती.

मी टोनीला बोलावलं होतं त्यादिवशी आई व मी, आम्ही दोघी एक वाजता तयार झालो. बरोबर एक वाजताच दरवाजाची बेल वाजली. मी दरवाजा उघडला. साठीतला, मध्यम उंचीचा एक माणूस दरवाजात उभा होता. सरळ नाक, तपकिरी डोळे, लांबट चेहेरा, इस्त्रीची काळी पँट, पांढरा शर्ट, डोक्यावर हॅट, चेहेऱ्यावर दिलखुलास हास्य. "हॅलो मिसेस—" तो अडखळला. आमचं आडनाव 'सहस्रबुद्धे' म्हणणं त्याला कठीण होतं हे माझ्या लक्षात आलं.

"मला 'अनिता' म्हण" मी सुचवलं.

"हॅलो अनिता" म्हणत त्याने डोक्यावरची हॅट काढून मला लवून अभिवादन केलं. मग 'हॅलो मॅम' म्हणत आईला अभिवादन केलं.

आई थोड्या आश्चर्याने टोनीकडे बघत होती. तिला अमेरिकन पुरुष भेटले होते. हस्तांदोलन करायला ती शिकली होती. पण असं अभिवादन करणारा टोनी हा पहिलाच.

"Let's go" म्हणत आम्ही टोनीच्या कारजवळ आलो. टोनीने प्रथम आईसाठी, मग माझ्यासाठी कारचे दरवाजे उघडले. ते बंद करून तो ड्रायव्हरच्या जागी स्थानापन्न झाला.

मी म्हणत होते त्या शाळा, पटांगण, पूल सगळं काही त्याला माहीत होतं. मी सांगे तिथे तो आम्हाला नेत होता. कार चालवताना मोठ्यांदी बडबड करून हसत होता. मुख्य विषय 'गेली चार वर्षे तो मुलांना आाणापोचवायचं काम करत होता तेव्हा काय घडलं' हा होता. त्याला ॲक्सेंट होता. हसत बोलण्याच्या त्याच्या सवयीमुळे त्याचं बोलणं समजणं कठीण जात होतं. पण त्याच्या हसण्यामुळे आई व मी दोघीही हसू लागलो. मी मोकळेपणाने, आई थोडी दबून. नेहमीसारखी, मंद स्मित करत.

सगळ्या शाळा, पटांगण वगैरे बघून झाल्यावर आम्ही प्रत्यक्ष मुलांना शाळेतून आणण्याच्या कामाला सुरवात केली. टोनीची फक्त आमच्या मुलांशीच नव्हे तर इतर बऱ्याच मुलांशी, शिक्षकांशी, अगदी शाळा झाडणाऱ्या शिपायाशीही ओळख होती. टोनी आणण्यापोचवण्याचं काम करणार म्हणून आमची मुलं खुष होती. पण प्रत्यक्षात त्याला भेटल्यावर त्यांना झालेला आनंद पाहून मला थोडंसं वाईटच वाटलं. माझ्या मुलांना माझ्यापेक्षा निदान ड्रायव्हर म्हणून टोनी बरा वाटत होता!

पाच वाजता टोनीने आम्हाला मुलांसह घरी पोचवलं. मुलांबरोबर टोनीचं छान जमलं. कारमध्ये मुलं त्याच्या बरोबर खिदळत होती.

घरी पोचताच आई म्हणाली, "कित्ती विनोदी आणि उमदा माणूस आहे! का ग तो एवढा हसत होता? काय सांगत होता?"

मी म्हटलं, "अग, मलातरी त्याचं बोलणं धड कुठे समजत होतं? त्याला इटॅलियन ॲक्सेंट आहे. शिवाय तो बोलताना हसत राहतो."

मी सुभाषला पकडलं आणि विचारलं, "Is Tony funny?"

"Mom, he's hillarious." तो म्हणाला.

रात्री जेवताना सुमेशने विचारलं, "कसं जमलं तुमचं सर्वांचं टोनीबरोबर?"

मला बोलायला संधीच मिळाली नाही. सगळी मुलं बोलू लागली. मग टोनीने सांगितलेले विनोद सांगू लागली. त्यांचं सांगून झाल्यावर सुमेश म्हणाला,"जमलेलं दिसतंय. त्याची कार कशी आहे?"

सुभाषने सांगितलं, "पाच वर्षे जुनी हॉंडा."

"स्वच्छ होती." मी म्हटलं, "उद्या मी त्याच्यासाठी एका कागदावर प्रत्येक मुलाला कुठे व किती वाजता पिकअप करायचं आणि ड्रॉप करायचं ते लिहून देईन. तो आईकडून एक वाजता येऊन कागद नेईल.

"तू त्याला फोन करून मुलांचा शेड्यूल का सांगत नाहीस?" सुमेशने विचारलं.

"त्याचा ॲक्सेंट, माझा ॲक्सेंट. घोटाळे होतील" मी म्हटलं.

मुलं एकमेकांकडे बघून हसली. मग रोहन म्हणाल, "बाबा, टोनीला सगळ्या गेम्स कशा खेळायच्या हे माहीत आहे. तो वेळ असला तर गेम्स पाहतो. चीअर करतो. काय चुकलं ते सांगतो. तो फार पॉप्युलर आहे."

"थोडक्यात तो व्यवस्थित काम करेल." सुमेश म्हणाला. आई म्हणाली, "तो कागद न्यायला येईल तेव्हा मी एकटीच असेन. त्याने काही विचारलं तर मी काय सांगू?"

"मला फोन करायला सांग." मी तिला सांगितलं.

आईचं समाधान झालेलं दिसलं.

पुढचे दोन आठवडे सगळं सुरळीत झालं. आईची भीड चेपलेली दिसली. मग एक दिवस मी घरी आले तर आई म्हणाली, "अग, तुझा तो टोनी आज बारालाच आला. दमलेला दिसत होता. तो म्हणाला, "काल रात्री काकांना हॉस्पिटलात न्यावं लागलं. रात्रभर झोप नाही. घरी जाऊन लंच घेऊन यायला वेळ नाही. एक तास इथेच बसतो. एक वाजता रोहनला आणायला जातो." मी त्याला विचारलं,"तू जेवलास का? तो म्हणाला, "रात्रीपासून स्नॅक्स खातोय." मग मी विचारलं, "माझ्याबरोबर आमच्या पद्धतीचं जेवण जेवशील का?" तो म्हणाला, "Yes, yes. Thank you." मग मी त्याला आपलंच वरण, भात, पोळी, भाजी असं जेवण वाढलं. त्याने छपन्न प्रश्न विचारले. तो खुषीने जेवला आणि म्हणाला, "बेस्ट फूड इन द वर्ल्ड."

ती जरा थांबली आणि तिने विचारले, "बरोबर वागले ना मी?"

मी हसले आणि म्हटलं, "अगदी बरोब्बर वागलीस."

त्या रात्री टोनीचा फोन आला. त्याचा काका खूप आजारी झाला होता. दोन दिवस तो येणार नव्हता.

पुढचे दोन दिवस मी कसंबसं मुलांना आणण्यापोचवण्याचं काम केलं. मग टोनीचा फोन आला, "काकाना थोडं बरं वाटतंय. उद्या येतो."

त्या दिवशी रात्री आई मला म्हणाली, "अग, तो साडेबाराला आला. फारच दमलेला दिसत होता. आज त्याला दीड वाजेपर्यंत जायचं नव्हतं. म्हणाला की दोन रात्री झोप नाही. मी त्याला 'जेवतोस कां' म्हणून विचारलं. तो खूष झाला. आनंदाने जेवला. तुझी काही हरकत नाही ना?"

मी म्हटलं, "आई, मला काही काम पडत नाही. तू जेवण करतेस. तू वाढतेस. माझी मुळीच हरकत नाही."

आई म्हणाली, "पण अग, खाद्यपदार्थांना पैसे नाही का पडत?" हा आईचा पुणेरी विचार.

मी हसले. तिला म्हटलं, "इथे डाळतांदूळदूधभाज्यांच्या किमती अगदी कमी आहेत. तू त्याला रोज जेवायला वाढलंस तरी मला चालेल."

"आणि सुमेश? तो काय म्हणेल?" आईने विचारलं.

मी आईकडे आश्चर्याने पाहिलं. "सुमेशला काय फरक पडतोय?" मी विचारलं.

आई म्हणाली, "जावई आहे. तू त्याला सांगितलेलं बरं."

माझी आई अजून मनाने तिच्या बालपणातच राहत होती. मी तिला आश्वासन दिलं. "सांगते त्याला. खरं तर सांगायची जरुरी नाही. पण तुझ्या समाधानासाठी सांगते."

नंतर केव्हातरी आईने मला बातमी दिली, "टोनीच्या काकाला नर्सिंग होममध्ये हलवलंय. टोनीने आणि त्याच्या नातेवाईकांनी काकांना आळीपाळीने भेटायचं ठरवलंय. त्यानुसार तो मंगळवारी आणि शुक्रवारी सकाळी नर्सिंगहोममध्ये काकांना भेटायला जातो. तिथे चार तास बसतो. मग आपल्याकडे परस्पर येतो. ते दोन दिवस मी त्याला आपल्याकडे जेव म्हटलंय. आणि हे बघ, आज तो मुलांसाठी मीटबॉल्स आणि सॉस घेऊन आलाय."

मुलांसाठी त्या दिवशी मी स्पगेटी केली. मुलं खूष झाली. त्यांना मीट बॉल्स आणि सॉस आवडलं. "मीट बॉल्स आणि सॉस टोनीच्या आंटीने केलंय." आईने सांगितलं.

मग तिने आम्हाला टोनीने सांगितलेली त्याची कथा सांगितली.

टोनीचा बाप इटलीत गरीब शेतकरी होता. टोनी हा त्याचा आठवा मुलगा. तो चौदा वर्षांचा होताच त्याच्या काकाने त्याला अमेरिकेत आणलं. शाळेत घातलं, पण शाळेत टोनीचं बस्तान बसलं नाही. मग काकाच्या हाताखाली तो घरं बांधायची कामं करू लागला. त्यात तो पटाईत झाला. इटलीला जाऊन एका इटॅलियन बाईशी त्याने लग्न केलं. त्याला एक मुलगा झाला. त्याची

बायको व मुलगा इटलीला गेलेले असताना त्याच्या बायकोला अपघात झाला. त्यात ती गेली. टोनीने एकट्यानेच मुलाला वाढवलं. त्याने परत लग्न केलं नाही.

मुलं गप्प बसून टोनीची कथा ऐकत होती.

"त्याचा मुलगा कुठे आहे?" मी विचारलं.

"कॅलिफोर्नियात. त्याचं लग्न झालंय. त्याला एक मुलगी आहे." आई म्हणाली.

सुमेशने माझ्याकडे बघून डोळा मारला.

रात्री तो म्हणाला, "टोनीने आईला अंदरकी बात सांगितली नाही."

मी विचारलं, "अंदरकी बात?"

तो म्हणाला, "टोनी रंगेल आहे. त्याची एक ठेवलेली आहे म्हणे. शिवाय त्याची अफेअरस् चालू असतात."

मी म्हटलं, "तो विधुर आहे. हवं ते करायला तो मुक्त आहे. त्याची अफेअरस् विवाहित बायकांशी असतात का?"

"ते मला माहीत नाही." सुमेश म्हणाला.

"तुला या बातम्या कुणी दिल्या? मी विचारलं.

"पॉलने. तो म्हणाल होता, "टोनी तुझ्या बायकोच्या मागे लागेल कदाचित! सुमेश म्हणाला.

"मग तू काय सांगितलंस?" मी विचारलं.

"मी म्हटलं, माझी बायको अशी सहज भुलणारी नाही."

"थँक यू!" मी म्हटलं.

"आता घडतंय भलतंच."

"काय घडतंय?" मी विचारलं.

"टोनी माझ्या बायकोच्या नाही पण माझ्या सासूच्या मागे लागलाय!" सुमेशने डोळा मारला.

मी हसले आणि म्हणाले, "बाबा गेल्यावर तिशीतल्या आईने पुनर्विवाहाला नकार दिला. ती आता अफेअर करणार आहे का?" मग थोडा विचार करून मी म्हटलं, "केलं तर काय हरकत आहे? ती विधवा आहे."

सुमेश मोठ्याने हसला. "तू पार अमेरिकन झालीयस." तो म्हणाला.

एका शुक्रवारी टोनी व आई जेवत असताना सुमेश परगावाहून अकस्मात परतला. किल्लीने दरवाजा उघडून आत आला. त्याला किचनमधून हसण्याबोलण्याचे आवाज ऐकू आले. तो थबकला. मग स्वैपाकघरात गेला. आईने उठून तत्परतेने त्याचं ताट मांडलं. तो जेवायला बसल्यावर टोनीने तो आईला सांगत होता तोच जोक सुमेशला मोठमोठ्याने हसत सांगितला.

त्या रात्री सुमेशने 'खरंच तुझ्या आईचं टोनीशी छान जमतंय. तिला विचार की तिचा व्हिसा वाढवून घेऊया का?' असं मला म्हटलं.

म्हणून मी आईला विचारलं, "आई, तुझा व्हिसा वाढवून घेऊ का? आणखी राहतेस का?"

आई म्हणाली, "नको ग बाई. थोडक्यात गोडी."

सुमेशचा अंदाज चुकला होता.

दिवस भरभर उलटले. आई उद्या जाणार होती. आईला सामान बॅगेत भरायल मदत करावी म्हणून मी घरी लवकर पोचले. टोनी मुलांना आमच्या घरी सोडून जायला निघाला होता. तो ड्राइव्हवेत मला भेटला. तो म्हणाला, "तुझी आई उद्या इंडियाला परत जातेय, तिच्यासारखी बाई मला आजपर्यंत भेटली नाही. तिला शक्य तितक्या लवकर परत आणशील का?"

मी त्याला आश्वासन दिलं, "प्रयत्न करीन टोनी."

पूर्वप्रसिद्धी : 'एकता' अंक १५२/ऑक्टोबर २०१६